# बृहन्मुंबई महानगरपालिका

सहा.अभियंता (घ.क.व्य.) जी/दक्षिण विभाग, ना. म. जोशी मार्ग, धनमिल नाका, मुंबई – 400013.

**क्र. सहा.अभि.(घकव्य)/जीद/217/दि.03.05.2024**

**विषय:- जी/दक्षिण विभागात वर्ष 2024 पावसाळी पुर्व व पावसाळ्या दरम्यान विविध वस्त्यांमधील उघडी व बंद गटारे तातडीने साफ करण्याच्या कामाकरीता ईच्छुक संस्थांकडून अर्ज मागविणे.**

## स्वारस्य अभिव्यक्ती (E.O.I.)

## जाहिरात

पर्जन्य जल वाहिनी खात्यांतर्गत जी/दक्षिण विभागात वर्ष 2024 पावसाळी पुर्व व पावसाळ्या दरम्यान विविध वस्त्यांमधील उघडी व बंद गटारे तातडीने साफ करण्याच्या कामाकरीता जी/दक्षिण विभाग कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात नोंदणीकृत असणा-या ईच्छुक स्थानिक नोंदणीकृत अशासकीय संस्थांमार्फत कामगारांचा पुरवठा करण्याकरिता संस्थेची निवड, पात्रता यादी तयार करुन सोडत पध्दतीने निवड करुन काम करण्यासाठी अर्ज मागवित आहे.

| अनु. क्र. | विषय | कामासाठी निवड करावयाच्या संस्था |
|---|---|---|
| 1. | **जी/दक्षिण विभागात वर्ष 2024 पावसाळी पुर्व व पावसाळ्या दरम्यान विविध वस्त्यांमधील उघडी व बंद गटारे तातडीने साफ करण्याच्या कामाकरीता अशासकीय संस्थांमार्फत कामगारांचा पुरवठा करण्याबाबत.** | **11** |

अर्जाचा नमुना जी/दक्षिण विभाग कार्यालयातील सहाय्यक अभियंता (घन कचरा व्यवस्थापन) यांचेकडे रु.330/- + 18% वस्तू व सेवा कर = एकुण **रु.390/-** रोख स्वरुपात किंवा राष्ट्रीयकृत बॅकेचा डी.डी. **बृहन्मुंबई महानगरपालिका** (BRIHANMUMBAI MUNICIPAL CORPORATION) या नावाने (ना-परतावा) नागरी सुविधा केंद्र (C.F.C.) येथे जमा केल्यानंतर अर्ज दि.**04.05.2024** ते दि.**09.05.2024** सकाळी **11.00** ते सायं. **05.30** वाजेपर्यंत (दुसरा व चौथा शनिवार वगळून) या वेळेत मिळु शकेल. पात्र संस्थांची यादी व सोडतीचा दिनांक जी/दक्षिण विभाग कार्यालय येथे सूचना फलकावर लावण्यात येईल. पात्र संस्थांच्या यादीमधुन सोडत पध्दतीने यशस्वी झालेल्या संस्थाना कामाचे वाटप संबंधित विभागाचे सहाय्यक आयुक्त योजनेच्या अटी व शर्तीनुसार करतील, प्रत्येक कामासाठी स्वतंत्र अर्ज व स्वतंत्र रक्कम भरणे आवश्यक आहे.

ईच्छूक संस्थांनी अधिक तपशिल, अर्ज व शपथपत्राच्या नमुन्यासाठी सहाय्यक अभियंता (घ.क.व्य.) जी/दक्षिण विभाग कार्यालयात संपर्क साधावा. संस्थंने जी/दक्षिण विभाग कार्यालयात अर्ज करण्याची अंतिम तारिख दि.**09.05.2024 दुपारी 03.00** वाजेपर्यंत आहे.

नमूद केलेल्या कार्यालयीन कालावधी नंतर दाखल करण्यात आलेले अर्ज विचारात घेण्यात येणार नाहीत.

**सही/-**

**सहाय्यक अभियंता (घ.क.व्य.) जी/दक्षिण विभाग**